# जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक
## लिपिक टंकलेखक पदभरती परीक्षा (८ जून, २०१४)

१) नुकतेच दिवंगत झालेले भाजपचे ज्येष्ठ नेते कै. गोपीनाथ मुंडे यांचेकडे १६ व्या लोकसभेत कोणत्या खात्याचे मंत्री पद सोपविण्यात आले होते ?
A) ग्रामविकास B) पंचायत राज C) पेयजल व स्वच्छता D) सर्व पर्याय बरोबर

२) २०१४ च्या १६ व्या लोकसभा निवडणुकांमध्ये खालीलपैकी कोणत्या व्यक्ती प्रत्येकी दोन मतदार संघातून निवडून आल्या ?
अ) नरेंद्र मोदी ब) मुलायमसिंग यादव क) रामविलास पासवान ड) उमा भारती
A) फक्त अ B) फक्त अ, ब C) अ, ब, क D) अ, ब, क, ड

३) फेब्रुवारी २०१४ मध्ये ......... या भाषेस अभिजात भाषेचा (Classical Language) दर्जा देण्यात आल्याने भारतातील अभिजात भाषांची संख्या आता ६ इतकी आली आहे ?
A) मराठी B) ओदिया C) मल्याळी D) तामिळ

४) २ जून २०१४ रोजी आंध्र प्रदेशच्या विभाजनातून 'तेलंगणा' हे भारतातील २९ वे घटकराज्य अस्तित्वात आले. तेलंगणा विधानसभेची सदस्य संख्या ........ इतकी आहे.
A) ८५ B) ११९ C) १४१ D) १७५

५) १२ जून २०१४ पासून 'एअर एशिया इंडिया' ही नवी विमान कंपनी अन्य हवाई कंपन्यांच्या तुलनेत देशातील सर्वात स्वस्त विमानसेवा सुरु करीत आहे. कोणत्या दोन शहरांदरम्यान ही हवाई सेवा सर्व प्रथम सुरु होणार आहे ?
A) मुंबई – दिल्ली B) पुणे – हैद्राबाद C) हैद्राबाद – कोची D) बंगळूरु – पणजी

६) सातव्या केंद्रीय आयोगाच्या अध्यक्षपदी कोणाची निवड करण्यात आली आहे ?
A) नीना अगरवाल B) न्या. अशोककुमार माथूर C) न्या. बी. एन. श्रीकृष्ण D) विवेक रे

७) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जीवन यांच्या जीवन कार्यावर आधारीत 'लोकमान्य' या चित्रपटात लोकमान्य टिळक यांची भूमिका कोणता अभिनेता साकारत आहे ?
A) अतुल कुलकर्णी B) सचिन खेडेकर C) सुबोध भावे D) ओम राऊत

८) २६ सप्टेंबर २०१३ रोजी भारतीय टपाल विभागाने देशातील कोणत्या संस्थेसाठी '११०२०१' हा नवा स्वतंत्र पिनकोड उपलब्ध करुन दिला आहे ?
अ) सर्वोच्च न्यायालय ब) राष्ट्रपती भवन क) प्रसार भारती ड) प्रेस ट्रस्ट ऑफ इंडिया (PTI)
A) फक्त अ B) अ, ब C) अ, ब, क D) अ, ब, क, ड

९) आसाम मधील दीब्रुगड ते तामिळनाडू मधील कन्याकुमारी दरम्यान धावणारी ........ ही भारतातील सर्वाधिक लांब अंतर (४२८२ किमी) धावणारी रेल्वे आहे.
A) शताब्दी एक्सप्रेस B) जनशताब्दी एक्सप्रेस C) विवेक एक्सप्रेस D) हिमसागर एक्सप्रेस

१०) नाशिक जिल्ह्यात खालीलपैकी कोणते राष्ट्रीय महामार्ग समाविष्ट आहेत ?
अ) NH - 3 ब) NH - 4 क) NH - 17 ड) NH - 50
A) फक्त अ B) अ, ब C) अ, क D) अ, ड

११) नाशिक जिल्ह्यात खालीलपैकी कोणत्या लोकसभा मतदार संघाचा समावेश होत नाही ?
A) नाशिक B) दिंडोरी C) धुळे D) येवला

१२) २००५ पासून महाराष्ट्रात अस्तित्वात आलेला 'मूल्यवर्धितकार' (व्हॅट) हा ........ प्रकारचा कर आहे.
A) प्रत्यक्ष कर B) अप्रत्यक्ष कर C) सामान्य कर D) यापैकी नाही

१३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना खालीलपैकी कोणत्या संस्थेच्या अथवा संस्थांच्या स्थापनेचे श्रेय द्यावयास हवे?
अ) बहिष्कृत हितकारिणी सभा ब) बहिष्कृत समाजसेवा समिती
क) शेड्युल्ड कास्ट फेडरेशन ड) पीपल्स एज्युकेशन सोसायटी
A) फक्त अ B) अ, ब C) अ, ब, क D) अ, ब, क, ड

१४) हिंदुस्थानला राजकीय हक्क देण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९२७ मध्ये ........ यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली.

A) सर जॉन सायमन B) लॉर्ड अँटेनबरो C) लॉर्ड साऊथबरो D) सर विव्हियन

१५) दक्षिण मध्य रेल्वेचे मुख्यालय खालीलपैकी कोणत्या शहरात आहे ?
A) हैदराबाद B) सिकंदराबाद C) चेन्नई D) कोलकाता

१६) मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ खालीलपैकी कोणत्या ठिकाणी नाही ?
A) नागपूर B) औरंगाबाद C) पणजी D) पुणे

१७) भारतात एकूण ........ घटक राज्ये व ........ केंद्र शासित प्रदेश आहेत.
A) २५ व ५ B) २६ व ७ C) २९ व ७ D) ३० व ५

१८) 'द टेस्ट ऑफ माय लाईफ' हे आत्मचरित्र कोणाचे ?
A) जसवंत सिंग B) अटलबिहारी वाजपेयी C) युवराज सिंग D) मिल्खा सिंग

१९) भारतात किती राज्यांना समुद्र किनारा लाभला आहे ?
A) ५ B) ७ C) ९ D) ११

२०) खालीलपैकी कोणत्या गृहाच्या सदस्यांना त्या गृहाचा सभापती निवडण्याचा अधिकार नसतो ?
A) लोकसभा B) राज्यसभा C) विधानसभा D) यापैकी नाही

२१) भारतीय राष्ट्रचिन्हाखालील 'सत्यमेव जयते' हा संदेश खालीलपैकी कोणत्या बाबींमधून निवडण्यात आला आहे?
A) सामवेद B) नारदस्मृती C) मुंडक उपनिषद D) कठोपनिषद

२२) खालीलपैकी कोणते सस्तन प्राणी (मॅमॅलिया) अंडी घालतात ?
अ) देवमासा ब) वटवाघूळ क) प्लॅटीपस ड) एकिडन
A) अ, ब B) क, ड C) अ, ब, क, ड D) अ, क, ड

२३) खाली 'अ' गटात प्रमुख भौतिक राशी व 'ब' गटात त्यांची एकके यांची यादी दिलेली आहे. त्यांच्या जोड्या जुळवणारा उत्तराचा योग्य पर्याय निवडा.

| **'अ' गट** | **'ब' गट** |
|---|---|
| अ) वारंवारिता | १) हर्टझ |
| ब) ध्वनी | २) डेसिबल |
| क) विद्युत रोध | ३) ओहम |
| ड) विभवांतर | ४) व्होल्ट |

A) अ–१, ब–२, क–३, ड–४ B) अ–४, ब–३, क–२, ड–१
C) अ–३, ब–१, क–२, ड–४ D) अ–२, ब–१, क–३, ड–४

२४) पोलिओचा विषाणू तोंडाद्वारे प्रवेश करुन ....... वर परिणाम करतो.
A) श्वसन संस्था B) चेतासंस्था C) रक्ताभिसरण संस्था D) सर्व बरोबर

२५) संगणकातील तात्पुरत्या मेमरीला काय म्हणतात ?
A) Random Access Memory B) Routine Access Memory
C) Ready Access Memory D) Regain Access Memory

२६) 'श्रीमंताना गर्व असतो.' या वाक्यात श्रीमंतांना हे ...... आहे.
A) नाम B) सर्वनाम C) विशेषण D) क्रियाविशेषण

२७) 'पाचशे रुपये ही काही लहान रक्कम नव्हे.' या नकारार्थी वाक्याचे होकारार्थी वाक्यात रूपांतर करा.
A) पाचशे रुपये ही देखील मोठी रक्कम आहे. B) पाचशे रुपये ही लहान रक्कम आहे.
C) पाचशे रुपये ही लहान रक्कम नाही का ? D) यापैकी नाही

२८) 'ज्ञ' हे संयुक्त व्यंजन ....... या व्यंजनापासून बनलेले आहे.
A) ज्ञ् + अ् B) द् + न् + य् C) द् + न् + अ् D) द् + न्य्

२९) एकाच आईच्या पोटी जन्म घेतलेल्या बंधुना ........ म्हणतात.
A) अनुज B) अग्रज C) सहोदर D) अनुग्रज

३०) 'ऐहिक' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?
A) पारलौकिक B) पारमार्थिक C) दृष्टान्तिक D) नौहिक

३१) 'समुद्र' या शब्दाशी समानार्थी नसलेला शब्द कोणता ?
A) समीरण B) अर्णव C) रत्नाकर D) सिंधू

३२) 'मोठ्या माणसाच्या अंगीदेखील दोष असतात' या अर्थाची म्हण ओळखा.
A) बडा घर पोकळ वासा B) दिव्याखाली अंधार C) नावडतीचे मीठ अळणी D) बळी तो कान पिळी

३३) 'सोन्यानाण्याचा मोह कुणालाच टाळता येत नाही' या आशयाची म्हण ओळखा.
A) नाव सोनूबाई हाथी कथिलाचा वाळा B) दुभत्या गायीच्या लाथा गोड

C) दाखविलं सोनं हसे मूल तान्हं　　D) दाम करी काम बिबी करी सलाम

३४) 'क्रीडांगण' या शब्दाचा समास ओळखा.
A) अव्ययीभाव　B) तत्पुरुष　C) द्विगू　D) बहुव्रीही

३५) खालीलपैकी कोणते द्वंद्व समासाचे उदाहरण नाही.
A) विटीदांडू　B) रामलक्ष्मण　C) कांदापोहे　D) राजपुत्र

३६) 'राजाला मुकुट शोभतो' या वाक्यातील कर्ता ओळखा.
A) राजा　B) मुकुट　C) शोभतो　D) यापैकी नाही

३७) घर पहावे बांधून आणि ........ (म्हण पूर्ण करा)
A) विहीर पहावी खणून　B) स्वर्ग पहावा मरून　C) लग्न पहावे करुन　D) खुशाल द्यावे ताणून

३८) 'ओनामा' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता ?
A) प्रारंभ　B) हाक　C) संबोधन　D) प्रत्यंतर

३९) 'षटकणी' होणे या वाकप्रचाराचा अर्थ कोणता ?
A) मुंज होणे　B) विवाह होणे
C) गुप्त गोष्ट इतरांना समजणे　D) गुप्तरीत्या पलायन करणे

४०) सुसंगती सदा घडो, सुजनवाक्य कानी पडो । या पंक्तीमधील अलंकार ओळखा.
A) अनुप्रास　B) श्लेष　C) अन्योक्ती　D) यमक

४१) डोळे हे जुलमी गडे रोखून मज पाहू नका.
A) शांत रस　B) शृंगार रस　C) अद्‌भुत रस　D) हास्य रस

४२) 'आई मुलाला खेळवते' या वाक्यातील क्रियापदाचा प्रकार ओळखा.
A) शक्य क्रियापद　B) भावकर्तृक क्रियापद　C) प्रयोजक क्रियापद　D) सहायक क्रियापद

४३) 'गुरुजी म्हणाले, पृथ्वी सूर्याभोवती फिरते' या वाक्याचे मिश्रवाक्य बनवा.
A) गुरुजी म्हणाले म्हणजे पृथ्वी सूर्याभोवती फिरते.　B) गुरुजी म्हणतात म्हणून पृथ्वी सूर्याभोवती फिरते.
C) गुरुजी म्हणाले, की पृथ्वी सूर्याभोवती फिरते.　D) ज्याअर्थी गुरुजी म्हणतात त्याअर्थी पृथ्वी सूर्याभोवती फिरते.

४४) 'वाङनिश्चय' या शब्दाचा विग्रह असा होईल :
A) वाक् + निश्चय　B) वांग + निश्चय　C) वाङ+ निश्चय　D) यापैकी नाही

४५) 'मला घरी पोहचण्यापूर्वीच सांजावले' या वाक्यातील प्रयोग ओळखा.
A) भावकर्तरी　B) कर्मकर्तरी　C) कर्म – भावसंकर　D) कर्तृ – कर्मसंकर

४६) 'विद्या' या शब्दाचे वचन कोणत्या प्रकारचे असू शकते ?
A) एकवचन　B) अनेकवचन　C) दोन्ही बरोबर　D) फक्त एकवचन

४७) 'पांढरे स्वच्छ दात मुखास शोभा देतात.' या वाक्यातील उद्देश्य ओळखा .
A) पांढरे　B) स्वच्छ　C) दात　D) शोभा

४८) 'अनुकरण' या शब्दाची जात ओळखा.
A) प्रत्ययघटित　B) उपसर्गघटित　C) शब्दसाधित　D) यापैकी नाही

४९) आला हा दारी उभा वसंत फेरीवाला. (अलंकार ओळखा)
पोते खांद्यावरी सोद्याचे, देई ज्याचे त्याला.
A) व्याजोक्ती　B) चेतनगुणोक्ती　C) श्लेष　D) व्याजस्तुती

५०) पुढील वाक्यात कोणता अर्थ लपला आहे ? तो समाज म्हणजे नरकच !
A) लक्ष्यार्थ　B) व्यंग्यार्थ　C) वाच्यार्थ　D) यापैकी नाही

51) Choose the noun form of the word 'Brief' .....
A) Briefness　B) Brieffing　C) Abbreviation　D) Briefcase

52) 'I have been writing letters since morning'.
Choose the correct kind of tense in above sentence of the alternatives given below.
A) Present Continuous　B) Present Perfect Continuous
C) Simple Present Tense　D) Past perfect Continuous

53) Which of the following sentences are grammatically correct ?
1) If you work hard, you will win a prize.　2) Work hard and you will win a prize.
3) If you want to win a prize, work hard.　4) Should you want to win a prize, work hard.
A) Only 1　B) 1 & 3　C) 1,2,3　D) 1,2,3,4

54) 'If we had lived a century ago, we would have missed much fun'
The above conditional sentence can also be written as ........

A) Had we lived a century ago, we would have missed much fun.
B) Had we live a century ago, we had missed much fun.
C) If we have lived a century ago, we would have missed much fun.
D) Had we lived a century ago, we would had missed much fun.

55) Of the following, which is not the collective noun.
A) Crowd B) Honesty C) Jury D) Herd

56) Of the following, which is not the abstract noun ?
A) Wisdom B) Youth C) Poverty D) Fleet

57) Mr. Patil teaches us grammer
Find out the passive form of the above sentence from the alternatives given below
A) Grammer is taught to us by Mr. Patil B) Grammer is being taught to us by Mr. Patil
C) Mr. Patil is being taught to us grammer D) Mr. Patil's grammer is being taught by us

58) Find out the sentence in 'passive voice' of the alternatives given below.
A) Marathi is spoken all over Maharashtra. B) I will teach you a lesson.
C) People speak English all over the world. D) We can thé umbrella in the rainy season.

59) Substitute one word for the following sentence -
The persòn who gives encouragement, moral or financial support to a person, cause etc. is called as ........
A) Veteran B) Almighty C) Mighty D) Patron

60) Give one word for the following sentence.
One who changes one's principles or party .........
A) Exchanger B) Exile C) Layman D) Turncoat

61) Feminine of Fox is ........
A) Foxes B) Foxhen C) Foxen D) Vixen

62) Masculine of Niece is ..........
A) Niecess B) Nice C) Nephew D) Nixen

63) He is good poet but not ........ Shakespeare (choose correct article from the following to fill in the blank)
A) a B) an C) the D) none

64) Kalidas is ......... Shakespeare of India.
A) a B) an C) the D) none

65) 'He spoke so fast that he could not be understood.'
The above sentence can also be written as .........
A) He spoke to fast too be understand B) He spoke too fast to be understand
C) He spoke too fast to be understood D) He speaks too fast to be understand

66) The teacher said, "The earth revolves round the sun."
Choose the indirect form of the above sentences of the alternatives given below.
A) The teacher says the earth revolved round the sun.
B) The teacher says that the earth revolves round the sun.
C) The teacher said that the earth revolves round the sun.
D) The teacher said that the earth revolve round the sun.

67) Choose the punctuated sentence of the following.
A) "Eknath, he said" to me, "I did not not expect it from you.'
B) "Eknath, he said to me, I did not expect it from you."
C) Eknath, he said to me, I did not expect it from you."
D) "Eknath", he said to me, "I did not expect it from you."

68) Every cloud has a ......... lining.
A) black B) brown C) golden D) silver

69) 'People in need must accept what is given'
Choose the correct proverb for the above sentence.

A) Blood is thicker than water B) Beggars cannot be choosers
C) The child is father of the man D) As you make the bed, so you must lie in it.

70) Which word of the following is not correct ?
A) Colonel B) Lieutenant C) Commissioner D) Commodore

71) Which of the following is not synonym of the word - 'Genuine ?'
A) Authentic B) Counterfiet C) Real D) Unadulterated

72) 'Yeoman' Service' means .........
A) Agricultural work B) Industrial work C) Excellent work D) Distructive work

73) Choose the correct meaning of the idiom : 'An eye for an eye' ........
A) Fixed target B) Waiting for a friend C) Complete revenge D) Foresight

74) Choose the correct meaning of the idiomatic expression : 'Fresh and Blood'
A) Human nature B) Best food C) Worst food D) Active person

75) Absence from duty without taking proper leave .......
A) Yeoman's leave B) French leave C) German leave D) Australian leave

७६) परागने भूगोलाच्या पुस्तकाची ८० पाने वाचली, त्यावेळी ३/४ पाने वाचायची शिल्लक होती, तर पुस्तक एकूण किती पानाचे आहे ?
A) २४० B) २८० C) ३०० D) ३२०

७७) १ ते १०० अंकां दरम्यान एकूण किती मूळ संख्या आहेत ?
A) १०० B) १३ C) २५ D) ९१

७८) कोल्हापूरहून २४० कि. मी. अंतरावरील पुणे येथे एका कामासाठी रवी मोटारसायकलवरून ६ तासात गेला. काम आवरून परतताना गाडीला वेग देत तो अवघ्या ४ तासात कोल्हापूरला पोहोचला, तर परतताना रवीने मोटारसायकलचा वेग ताशी किती किमीने वाढवला ?
A) २० B) ३० C) ४० D) ५०

७९) धावण्याच्या स्पर्धेसाठी तयारीत थांबलेल्या मुलांच्या रांगेत अनिलचा क्रमांक डावीकडून ७ वा व उजवीकडून १३ वा आहे तर रांगेतील एकूण मुलांची संख्या किती ?
A) २० B) २१ C) १९ D) १८

८०) १० ते ९९ संख्या दरम्यान ५ हा अंक किती वेळा येतो ?
A) ११ B) १९ C) २१ D) ३३

८१) खालील पदावलीतील सर्वात लहान अपूर्णांक कोणता ?
A) २/३ B) २/५ C) २/७ D) २/९

८२) ५ लिटर पाणी म्हणजे किती मिलिलीटर पाणी ?
A) ०.५ मिली B) ०.५०० मिली C) ५०० मिली D) ५००० मिली

८३) १९८८ साली प्रजासत्ताक दिन मंगळवारी आला, तर २६ जानेवारी १९८९ रोजी कोणता वार होता?
A) सोमवार B) मंगळवार C) बुधवार D) गुरुवार

८४) ४३,२०० सेकंद म्हणजे किती तास ?
A) १ तास B) ६ तास C) १२ तास D) २४ तास २० सेकंद

८५) रमेशला दुकानदाराने ४ डब्यांची किंमत ६० रुपये सांगितली. मात्र रमेशने १४४ रुपयांना १२ डबे खरेदी केले, तर प्रत्येक डब्यामागे त्याचे किती रुपये वाचले ?
A) ३ रुपये B) ५ रुपये C) १.५ रुपये D) ३.५० रुपये

८६) मी ATM मधून ५०० रुपयांच्या काही नोटा काढल्या. या नोटांचे क्रमांक अनुक्रमे ३२१५७६ ते ३२१५९० असे होते. तर मी ATM मधून एकूण किती रक्कम काढली ?
A) ७००० रुपये B) ७५०० रुपये C) ८००० रुपये D) ८५०० रुपये

८७) एक भिंत बांधण्यास ४ मजुरांना १२ दिवस लागतात, तर तेच काम २ मजूर किती दिवसांत पूर्ण करतील ?
A) १६ B) १८ C) २४ D) २८

८८) खालील संख्यांमधील संबंध ओळखून प्रश्नचिन्हाच्या जागी योग्य पर्याय निवडा.
९(३४)१६, ४९ (७६)३६, ४(?) ६४,
A) २८ B) ३२ C) ३६ D) ४८

८९) ऊसाला रताळे म्हटलं, रताळ्याला बटाटा म्हटले, बटाट्याला गुलाब म्हटले आणि गुलाबाला ऊस म्हटले तर साखर कशापासून बनविता येईल ?

A) ऊस B) रताळे C) बटाटा D) गुलाब

९०) पुढील पदावली पूर्ण करण्यासाठी अक्षरांचा योग्य क्रम निवडा.
ab_ddca_a_cd_cab
A) cbbd B) cabd C) cdab D) abcd

९१) I, N, R, U, ?
A) V B) W C) X D) Y

९२) पूर्वा अर्णवला म्हणाली ''तुझ्या बाबांची बायको ही माझ्या आईच्या आई–बाबांची ''एकुलती मुलगी आहे'' तर पूर्वा अर्णवची कोण ?''
A) बहीण B) मावसबहीण C) आतेबहीण D) मामेबहीण

९३) जेवणाच्या पंक्तीत शिवाजीच्या डावीकडे गंगाधर बसला. अनिल शिवाजीच्या उजव्या बाजूला बसला. अनिल व अमोल यांच्या मध्ये कुणाल बसला. या माहितीआधारे खालील प्रश्न सोडवा.
A) अनिल B) शिवाजी C) कुणाल D) अमोल

९४) कवायतीच्या वेळी उमेश नैऋत्येकडे तोंड करुन उभा होता. प्रथम तो उजवीकडे दोन वेळा काटकोनात वळला. नंतर डावीकडे तीनवेळा काटकोनात वळला, तर आता उमेशचे तोंड कोणत्या दिशेला आहे?
A) वायव्य B) नैऋत्य C) पूर्व D) ईशान्य

९५) एका संख्येत तिची निमपट मिळविल्यास १२३ मिळवतात. तर ती संख्या .......
A) ७२ B) ८४ C) ८२ D) ७०

९६) ११.२ ÷ १.४ = किती ?
A) ८ B) ०.८ C) ०.००८ D) ०.०००८

९७) BY, WD, FU, ?, JQ
A) SH B) TG C) GT D) HS

९८) संदीप सुरेश पेक्षा उंच पण सतिश पेक्षा ठेंगू आहे. रमेश शरद पेक्षा उंच पण गोविंद पेक्षा ठेंगू आहे. रितेश सुरेश पेक्षा ठेंगू पण गोविंद पेक्षा उंच आहे, तर उंचीच्या क्रमाने मधोमध कोण येईल ?
A) सुरेश B) गोविंद C) रितेश D) शरद

९९) गौरी व अर्णवची आजची वये अनुक्रमे ७ वर्ष व ३ वर्ष आहे. आणखी किती वर्षांनी या दोघांच्या वयाची बेरीज २६ वर्षे होईल ?
A) ५ वर्षे B) ८ वर्षे C) ११ वर्षे D) १६ वर्षे

१००) एका हौदाची लांबी ४ मीटर, रुंदी १.५ मीटर व उंची १ मीटर आहे. तो पाण्याने काठोकाठ भरलेला आहे. ८ लीटर मापाच्या बादलीने तो रिकामा केल्यास किती बादल्या पाणी काढले ?
A) ७५ B) ७५० C) ३०० D) ६००

**उत्तरे : जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक**

**लिपिक टंकलेखक पदभरती परीक्षा (८ जून, २०१४)**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–D | २–B | ३–B | ४–B | ५–D | ६–B | ७–C | ८–A | ९–C | १०–D |
| ११–C | १२–B | १३–D | १४–A | १५–B | १६–D | १७–C | १८–C | १९–C | २०–B |
| २१–C | २२–B | २३–A | २४–B | २५–A | २६–A | २७–A | २८–B | २९–C | ३०–B |
| ३१–A | ३२–B | ३३–C | ३४–B | ३५–D | ३६–B | ३७–C | ३८–A | ३९–C | ४०–D |
| ४१–B | ४२–C | ४३–C | ४४–A | ४५–A | ४६–C | ४७–C | ४८–B | ४९–B | ५०–A |
| 51-A | 52-B | 53-C | 54-A | 55-B | 56-D | 57-A | 58-A | 59-D | 60-D |
| 61-D | 62-C | 63-D | 64-C | 65-C | 66-C | 67-D | 68-D | 69-B | 70-B |
| 71- | 72-C | 73-C | 74-A | 75-B | ७६–D | ७७–C | ७८–D | ७९–C | ८०–B |
| ८१–D | ८२–D | ८३–D | ८४–C | ८५–A | ८६–B | ८७–C | ८८–A | ८९–B | ९०–A |
| ९१–B | ९२–A | ९३–D | ९४–A | ९५–C | ९६–A | ९७–A | ९८–A | ९९–B | १००–B |